**BDC LIBRARY**

**News Paper Clipping**

**A.Y. 2025-26**

# स्थानिक कलाकारांच्या 'जगदंब फोक आख्यान'ने प्रेक्षकांची मने जिंकली

▲पाटण, दि. ४ : पाटण महोत्सवात झालेल्या 'जगदंब फोक आख्यान' या पाटण तालुक्यातील स्थानिक कलाकारांच्या लोकगीतांच्या कार्यक्रमाने उपस्थित प्रेक्षकांची मने जिंकली. या कार्यक्रमास प्रेक्षकांची तोबा गर्दी पहावयास मिळाली. कोयना शिक्षण संस्थेचे जनरल सेक्रेटरी अमरसिंह पाटणकर, संचालक याज्ञसेन पाटणकर, प्राचार्य विलास कळंत्रे यांच्या हस्ते जगदंब फोक आख्यान कार्यक्रमाचे उद्घाटन व शुभारंभ सोहळा पार पडला.



जगदंब फोक आख्यानमधील स्थानिक कलाकारांची टीम. (नितीन खैरमोडे)

ढोलकीचा दणदणाट, हलगीचा कडकडाट व संबळाचा जागर, धनगरी ढोलांचा बाज आणि दिलखेचक सादरीकरणाने संपूर्ण महाराष्ट्रात धुमाकूळ घालत असणाऱ्या फोकलोक या आगळ्या वेगळ्या महाराष्ट्राची सांस्कृतिक कला जोपसणारा लोकगीत गोंधळ व लावणी गीत प्रकाराने पाटण महोत्सवात चांगलीच रंगत आणली. पाटण तालुक्यातील उमद्या कलाकारांच्या सादरीकरणातून नव्याने उभारी घेणाऱ्या जगदंब फोक आख्यान या कार्यक्रमाने अक्षरशः प्रेक्षकांनी डोक्यावर घेतले. उपस्थित कलारसिकानी या आगळ्या वेगळ्या कार्यक्रमाचा आस्वाद घेतला.

कोयना शिक्षण संस्था व रोटरी क्लब पाटण यांच्या संकल्पनेतून होत असलेल्या पाटण महोत्सवात कृषी, आरोग्य खाद्यभ्रमंती ,शेती, विविध बचत गटांच्या माध्यमातून महिला पुरुष व युवकांना रोजगार उपलब्ध व्हावा या उद्देशाने या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. महोत्सवात सकाळ सत्रापासून प्रदर्शनाबरोबर सांस्कृतिक कला, संगीत, नृत्य या भरगच्च कार्यक्रम पाटणवासियांसाठी मोठा पर्वणी ठरला. सिनेअभिनेत्री कल्याणी नंदकिशोर यांचा खेळ पैठणीचा हा खास महिलांसाठी झालेला कार्यक्रमही अप्रतिम झाला. सायंकाळच्या सत्रात पाटणवासियांसाठी अविस्मरणीय ठरलेला जगदंबा फोक आख्यान या कार्यक्रमाला उपस्थितानी डोक्यावर घेतले. यामध्ये गण, गवळण, कै. पट्टे बापूराव यांच्या कवनांचा तसेच छ. शिवरायांच्या जीवनावर आधारीत गीते तसेच पारंपरिक गोंधळ, जागरण, देवीच्या गीताने आणि पारंपरिक वाद्यातील ढोलकी हलगी, ताशा टाळ मृदंग व संबळाच्या कडकडाटाने उपस्थित महिला, पुरुषाना, तरुण, तरुणींना गाण्याच्या तालावर अक्षरशः ठेका धरायला लावला. या कार्यक्रमाचे खास आकर्षण म्हणजे या फोक आख्यानात सर्व पारंपरिक वाद्यांचा गजर झाला. कोणतेही इलेक्ट्रॉनिक वाद्य प्रकार नव्हता.

या कार्यक्रमाचे दिग्दर्शक शंकर माथणे, विनायक संकपाळ यांनी आपल्या शाळेतील विद्यार्थी व सर्व वाद्यवृंद व कलाकार याना घेवून हा कार्यक्रम पार पाडला.